10 डिसेंबर 2013

# संयुक्त संसदीय समितीने पंतप्रधानांचा बचाव केल्यास आणखी समस्या वाढतील

अरुण जेटली

विरोधी पक्षनेते, राज्यसभा

संसदेने 2 जी स्पेक्ट्रम घोटाळ्यासंदर्भातील चौकशी करण्यासाठी संयुक्त संसदीय समिती (जेपीसी) नेमण्यात आली. जेपीसी ने दिलेला अहवाल आज राज्यसभेत ठेवण्यात आला तेव्हा तो बहुमताने मंजुर करण्यात आला. कॉंग्रेस पक्ष आणि युपिए सरकारने नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकींच्या निकालावरुन धडा घेतला पाहिजे होता परंतु तसे झाले नाही. आधी भ्रष्टाचाराचा आनंद उपभोगायचा आणि नंतर बचाव करण्यासाठी संविधानिक संस्था उलथवून टाकायची अशी निती कॉंग्रेसची आहे.

जेपीसी ने यासंदर्भात खालील प्रमुख मुद्दयांचे परिक्षण केले आहे.

1) का स्पेक्ट्रमचे वाटप 2008 साली 2001 सालच्या किंमतीने केले गेले आहे.

2) स्पेक्ट्रमचा वाटप झाले तेव्हा त्याच्या दरात काही फरक होता का?

3) का पंतप्रधान आणि अर्थमंत्री यांना याबद्दलची सर्व माहिती होती आणि टेलिकॉम मंत्र्यांनी घेतलेल्या गुप्त निर्णयाला जाणून होते

अहवालात या मुद्दयांवर जास्तीत जास्त लक्ष दिले गेले नाही. तर याच्या विसंगत अंतिम भागात एनडीए सरकारवर खापर फोडण्यात आले आहे. साहजिकच आहे त्यामुळे अहवालाची विश्वसनीयता कमी झाली आहे. जेपीसी ने बोफोर्स प्रकरणाबद्दल परिकल्पना केली की बोफोर्स मधील कमिशन हे दलालांना देण्यात आले जी लाच नव्हती. सीबीआयचे आरोपपत्र या कहाणीपुढे निष्फळ ठरले. जर आपल्याला संसद संस्थेची प्रतिष्ठा जपायची असेल तर आपल्याला खात्री मिळायला पाहिजे की सत्य बाहेर आले पाहिजे आणि कोणाचा बचाव केला नाही पाहिजे.

एक असहमतीचे पत्र जे विरोधी खासदारांनी टेलिकॉंमच्या अध्यक्षांना दिले होते ते जेपीसीने एडिट केले. आज मी हा मुद्दा राज्यसभेत उठवला, समितीचे अध्यक्ष अनावश्यक भाग संपादित करु शकतात का किंवा असंसदीय उल्लेख पत्रावर केला जाऊ शकतो, किंवा तो असहमतीच्या पत्रावर वास्तविक सार बदलू शकतो आणि ते पत्र मग जमा केले जाऊ शकते? असे केल्यास अध्यक्षांनी विशेषाधिकाराचा भंग केला असे होते. या मुद्द्यावर चर्चा करण्यास मी पक्षाच्या प्रमुखांना आमंत्रित केले परंतु दुर्दैव असे की कोणीच आले नाही.

मला या गोष्टीचाच दिलासा आहे की आता सरकारचे पितळ उघडे पडले आहे. राजाची वस्त्रे निघाली आहेत. तरीसुद्धा संसद जेपीसीच्या माध्यमातून बचाव करण्याचा प्रयत्न करत आहे ते समस्या निर्माण करील.